Estd : 1962
NAAC "A" Grade

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९००० संलग्नता टी-२ विभाग दूरध्वनी -०२३१ - २६०९०९१
संचालक, बी.सी.यु.डी. कार्यालय, दूरध्वनी : (थेट) ०२३१ - २६०९०७०

# -:: परिपत्रक ::-

## स्थानिक चौकशी समिती अहवाल नमुन्यानुसार स्वयंमुल्यांकन करून सी.डी. विद्यापीठ कार्यालयास सादर करणेबाबत....

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांकडून प्राथमिक संलग्निकरण, नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार इत्यादी प्रकारातील प्रस्ताव दरवर्षी आवश्यकतेनुसार मान्यतेकामी सादर केले जातात. सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने महाविद्यालयांच्या प्रत्यक्ष तपासणीकामी स्थानिक चौकशी समित्या पाठवाव्या लागतात. याकामी समित्यांना स्थानिक चौकशी समिती अहवाल विद्यापीठामार्फत पुरविले जातात. गुणांक पध्दतीने तयार करण्यात आलेले नवीन अहवाल नमुने विद्यापीठ संकेतस्थळावर **(www.unishivaji.ac.in → Affiliation → Affiliation T 2 Information Lists → Final Local Inquiry Committee Report Formats)** दि. २४.०१.२०१९ रोजी शाखानिहाय प्रसिध्द करण्यात आले आहेत. या विभागाकडील परिपत्रक जा.क्र. शिवाजी विद्यापीठ/संलग्नता/टी-२/२३२ दि. ३१ जानेवारी २०१९ अन्वये स्वयंमुल्यांकन अहवाल या कार्यालयास दि. ०४.०२.२०१९ अखेर सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि, अद्यापही बऱ्याच महाविद्यालयांनी/संस्थांनी स्वयंमुल्यांकन अहवाल सादर केलेले नाहीत.

सबब, आपणांस पुनःश्च आदेशान्वये कळविण्यात येते की, संदर्भित दि. ३१.०१.२०१९ रोजीच्या परिपत्रकामध्ये विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार स्वयंमुल्यांकन अहवाल दि. ०८.०२.२०१९ अखेर या कार्यालयास सादर करण्यात यावेत. जी महाविद्यालये/संस्था स्वयंमुल्यांकन अहवाल सादर करणार नाहीत अशा महाविद्यालये/संस्थांना स्थानिक चौकशी समित्या पाठविता येणार नाहीत. तसेच ज्या महाविद्यालयांनी/संस्थांनी नुतनीकरण/नैसर्गिक विस्ताराचे प्रस्ताव सादर केलेले नाहीत, अशा महाविद्यालये/संस्थांनी स्वयंमुल्यांकन अहवाल सादर करण्याची आवश्यकता नाही, याची नोंद घ्यावी.

कुलसचिव

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/संस्था, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जा.क्र. : शिवाजी विद्यापीठ/संलग्नता/टी-२/ 240
दिनांक : 17 FEB 2019

E:\E\Baba\2017-18\Circular Format.Docx